# परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

विद्यार्थी परिचारिका वसतिगृह इमारत, तळ मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
वेबसाईट: msbnpe.org ई-मेल- ppasss२०२२@gmail.com ,मो. नं: ९८६७८७७४५३

## NURSING DIPLOMA COURSE SHIKSHAN SHULKA SAMITI

Student nurses hostel building, Ground floor, St. Georges hospital campus, p.d'melo road, Fort, Mumbai-४०० ००१
website: www.ndcsss.info.com e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- 9867877453

क्र पपअशिशुस / बैठकीचे इतिवृत्त/ १०४ /२०२६ दिनांक: १० /०८/२०२६

प्रति,

१. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
२. अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. सहाय्यक संचालक, (लेखा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई

**विषय** :- शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत.

**संदर्भ** - १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१, दिनांक.१३.१२.२०२२.

उपरोक्त शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीची बैठक आयुक्त तथा अध्यक्ष, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.२८ जुलै,२०२६रोजी सकाळी ११.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

उपसचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये
विभाग तथा सदस्य सचिव

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
२. उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
३. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
४. सहाय्यक संचालक, (लेखा), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.
५. सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक.

# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि. २८.०७.२०२६ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते :-

१) उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य सचिव
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
३) सहाय्यक संचालक, लेखा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.
६) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल
७) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे -

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १. | मागील बैठकीत सादर शै.व.२०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन ३(Review) शुल्क मंजुरीबाबत. | शै.व.२०२५-२६ च्या शिक्षण शुल्क ३ प्रस्तावांचे पुनर्विलोकन (Review) करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख ( प्रतिनिधी ) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

**पुनर्विलोकन REVIEW A.Y.२०२५-२६**
**ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम**

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १२९५ | साई केअर नर्सिंग स्कूल, ता. शहापूर, जि. ठाणे. | ANM | ४३६३६ | ४३६४ | ४८००० |

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | १२९५ | साई केअर नर्सिंग स्कूल, ता. शहापूर, जि. ठाणे. | GNM | ४५४५५ | ४५४५ | ५०००० |
| ०३ | १२०९ | सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट, करवीर, कोल्हापूर | GNM | ४५४५४ | ४५४६ | ५०००० |
| ०४ | ०९९४ | महात्मा फुले नर्सिंग स्कूल, अकोला | GNM | ४५४५७ | ४५४३ | ५०००० |

| अ.क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ०२. | शै.व. २०२५-२६ च्या विशेष अतिरिक्त मुदतवाढीत सादर केलेले (०२) प्रस्ताव No Upward Revision शुल्क मंजुरीसाठी सादर . | शै.व. २०२५-२६ च्या विशेष अतिरिक्त मुदतवाढीत सादर केलेले (०२ ) प्रस्ताव No Upward Revision शुल्क मंजुरीसाठी सादर. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| Sr No | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५-२६ | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ११६२ | गुरुकुल नर्सिंग इन्स्टिट्यूट, दर्यापूर, अमरावती | ANM | ४७२७३ | ४७२७ | ५२००० | NO UPWARD REVISION |
| ०२ | ११९४ | भगवानबाबा स्कूल ऑफ नर्सिंग, कोठलाज, हिंगोली | ANM | ३७२७३ | ३७२७ | ४१००० | |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ०३. | शै.व. २०२५-२६ च्या विशेष अतिरिक्त मुदतवाढीत सादर केलेले (१६) प्रस्ताव Upward Revision शुल्क मंजुरीसाठी सादर . | शै.व. २०२५-२६ च्या विशेष अतिरिक्त मुदतवाढीत सादर केलेले (१६) प्रस्ताव प्राप्त झालेल्या संस्थाचे शिक्षण शुल्क प्रस्ताव Upward Revision मंजुरीसाठी सादर . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

Upward Revision A.Y.२०२५-२६

ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y. २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १२४८ | ट्रीटवेल कॉलेज ऑफ नर्सिंग, नागपूर | GNM | ५४७५१ | ५७४९ | ६०५०० |
| ०२ | ६९० | जीएस नर्सिंग स्कूल, साकोली, भंडारा | ANM | ४४३४४ | ४६५६ | ४९००० |
| ०३ | १२७२ | नवयुवा कॉलेज ऑफ नर्सिंग, भंडारा. | GNM | ५५००० | ५५०० | ६०५०० |
| ०४ | ६८७ | नवयुवा नर्सिंग स्कूल, भंडारा | ANM | ६५१५८ | ६८४२ | ७२००० |
| ०५ | १०२८ | युनिक आरएएनएम नर्सिंग स्कूल परळी | ANM | ४०९०९ | ४०९१ | ४५००० |
| ०६ | ९९८ | अपूर्वा नर्सिंग इन्स्टिट्यूट, परभणी | GNM | ३१८१८ | ३१८२ | ३५००० |
| ०७ | ५३३ | शरदराव नर्सिंग कॉलेज, नायगोणा नांदेड | ANM | ४२५३४ | ४४६६ | ४७००० |
| ०८ | १२२१ | नोबेल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, पुणे | GNM | ५३३९३ | ५६०७ | ५९००० |

| Sr No | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y. २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | ५७१ | आझाद हिंद नर्सिंग स्कूल, अकोला | ANM | ४२५३४ | ४४६६ | ४७००० |
| १० | ८३ | महालक्ष्मी नर्सिंग इन्स्टिट्यूट, कोल्हापूर | ANM | ३१२२२ | ३२७८ | ३४५०० |
| ११ | ९९७ | स्वर्गीय पार्वतीबाई बुरडे नर्सिंग स्कूल चाकूर लातूर | GNM | ४२५३३ | ४४६७ | ४७००० |
| १२ | ३८३ | राष्ट्रमाता जिजाऊ नर्सिंग स्कूल, निलंगा, लातूर | ANM | ३८९१४ | ४०८६ | ४३००० |
| १३ | ३१८ | शारदाबाई पवार इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, पुणे | ANM | २७०२७ | २९७३ | ३०००० |
| १४ | ३१८ | शारदाबाई पवार इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, पुणे | GNM | ३५१३४ | ३८६६ | ३९००० |
| १५ | ७२ | उमा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, सांगली | ANM | ३५२९३ | ३७०७ | ३९००० |
| १६ | ७२ | उमा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, सांगली | GNM | ३४३८९ | ३६११ | ३८००० |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ०३. | शै.व. २०२६ - २७ साठी शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीकरीता सनदी लेखापाल (CA) यांच्या नियुक्ती बाबत चर्चा. | शै.व.२०२६-२७ साठी प्रस्ताव छाननीकरीता लेखापाल फर्म म्हणून मे.कैलास गांधी अँड असोसिएट्स यांना मागील वर्षा प्रमाणे छाननी शुल्क प्रति प्रस्ताव रु. १०००/- (रुपये एक हजार) या खर्चासह अटी व शर्तीसह मंजूरी देण्यात आली आहे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय |
|---|---|---|---|
| ०४. | शै.व. २०२६ - २७ च्या शिक्षण शुल्क प्रस्ताव छाननीच्या बैठकीकरीता निमंत्रित परिव्यय लेखापाल (CMA) यांच्या नियुक्ती बाबत चर्चा. | ए.एन.एम., जी.एन.एम व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रम महाविद्यालयाचे शै.व.२०२६-२७ करीता शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी मागील वर्षाप्रमाणे परिव्यय लेखापाल (Cost Accountant ) म्हणून श्रीमती वैशाली बापट व सनदी लेखापाल (Chartered Accountant) श्री.कैलाश गांधी यांना बैठक भत्ता प्रति बैठक रु.७५००/- फक्त असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ०५. | अतिरिक्त शुल्क वसुलीच्या प्राप्त तक्रारीवर चर्चा. | सदर तक्रारी प्राप्त संस्थाना प्राप्त तक्रारींच्या संदर्भात पत्राद्वारे स्पष्टीकरण मागवून पुढील बैठकीत समितीसमोर सादर करण्यात यावे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ०६. | कार्यालयीन अधिक्षक यांच्या मुदतवाढी बाबत चर्चा व निर्णय. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीचे कामकाज सुरळीत ठेवण्याकरीता श्री .रमेश पाडावे यांना कार्यालयीन अधिक्षक ( कंत्राटी ) या पदावर दि.०१/०८/२०२६ पासून ०३ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याचे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ०७. | शै.व. २०२५-२६ च्या शुल्क मंजुरीसाठी ऑनलाइन प्रस्ताव व हार्ड कॉपी सादर न केलेल्या संस्थाच्या पत्रावर चर्चा. | शै.व. २०२५-२६ साठी ऑनलाइन प्रस्ताव सादर न केलेल्या आणि केवळ ऑनलाइन प्रस्ताव सादर केलेल्या परंतु हार्ड कॉपी सादर न केलेल्या संस्थांच्या हार्डकॉपी यापुढे स्वीकारल्या जाणार नाहीत व शै.व. २०२५-२६ च्या शुल्क मंजूरी करीता भविष्यात विचार केला जाणार नाही. तसेच सदर संस्थांची यादी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ आणि MAHADBT यांना सादर करावी व मंडळाने याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांमार्फत सूचित करण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ०८. | शै.व. २०२६-२७ मध्ये मंजूर करण्यात आलेल शुल्क शै.व. २०२७-२८ साठी कायम ठेवण्या संदर्भातील चर्चा. | प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी शुल्क निर्धारण करून त्याबाबतचा आदेश प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी निर्गमित करणे आवश्यक असते, जेणेकरून संबंधित संस्थांना प्रवेशित विद्यार्थ्यांकडून समितीने मंजूर केलेले शुल्क आकारता येईल. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शुल्क निर्धारणाची प्रक्रिया नियोजित वेळेपेक्षा उशिरा सुरू | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झालेली असून ती अद्याप सुरू आहे. त्यामुळे, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी शुल्क निर्धारणाची प्रक्रिया पूर्ण करणे प्रशासकीय दृष्ट्या शक्य होणार नाही.<br>त्यामुळे, या नियमावलीतील इतर कोणत्याही तरतुदींना बाधा न आणता, नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समिती (NDCSSS) यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मंजूर केलेले शुल्क हेच शैक्षणिक वर्ष २०२७-२८ साठी लागू राहील. त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सर्व संबंधित संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी समितीने मंजूर केलेले शुल्कच आकारावे, असे मा. अध्यक्षांमार्फत सुचित करण्यात आले. | |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा
व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

Sadegaonkar

सहाय्यक संचालक,
लेखा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

संचालिका,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष